वर्ष तेरावे : अंक २२ : ऑक्टोबर २०२५



शिक्षक दिन



# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA




जागतिक कर्णबधिर दिन

Volume Thirteen : Issue 22 : OCTOBER 2025 Total Pages : 16 Rs. 10/-

# शिक्षक दिन










# पाटीपूजन















**COCHLEA WARTA** | **कॉक्लिआ वार्ता**

**वर्ष : १३ वे | अंक : २२**



**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे


## अंतरंग


**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**शिक्षक दिन : प्रेरणेचा रंगमंच** ... ०३
– रक्षा देशपांडे

**माझ्या विशेषत्वाने घडवलेली माझी ओळख – विशेष शिक्षिका** ... ०४
– सोनाली करमरकर

**देवालयांच्या अंगणात घुमला कर्णबधिरतेविषयी जनजागृतीचा संदेश** ... ०६
– तृप्ती कोहिनकर

**जागतिक कर्णबधिर दिवसाचा जनजागृती जागर** ... ०८
– कादंबरी जोशी

**कर्णबधिर म्हणजे काय?** ... ०९
– गोकुळ निवांगुणे

**स्वरनादमधील शिक्षिका** ... १२
– मंगल बोंबले



| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

Teachers day was celebrated in Swaranaad by inviting Hema Honwad madam, a very experienced teacher, doing a lot of social work in rural areas of Maharashtra. She had a very intense interaction with the teachers and all the teachers said that they have a different perspective of life with her tips. Raksha madam has given a brief on the same in this issue.

Deaf week was celebrated by Swaranaad , Kothrud, by going to seven temples in different parts of Pune. As ladies go to the temples in Navratri, it was the best place to spread awareness about hearing impairedness.

Sonali Karmarkar, our teacher did the DTYHI course after she underwent a cochlear implant..As she came from a family of teachers, she started teaching in Swaranaad and is very happy to be with the children who have a disability same as her's. In her write up she has very well explained how she has learnt many things from her colleagues as well as her students.

Shital Jogavade, our teacher in Daund centre, has given a write up on how they celebrated Deaf week on 25, 26 and 27th of September. on 25th September they took the children's games on memory, activity etc. On 26th they visited the health centre Kurkum for a program on women's problem. There were about 700 to 800 people there. There were doctors, nurses and our teachers could tell the dignitaries about our project. The dignitaries also spoke with our Hearing Impaired children from Daund centre. On 27th the rally started from the centre with slogans and banners and they distributed our pamphlets in 3-4 chowk's around our centre. They told the vegetable vendors, policemen about the preschool and they also exchanged words with our children.

There were social workers from PHC Kudgaon, who were briefed about early detection and intervention by our teachers.

Gokul Nivangune, who looks after our centres in Parvari and Fonda has written about Hearing Impairedness, the necessity of preschool for these children and what one can do about it.

This is how teachers of Swaranaad find innovative ways, not only in teaching but also in celebrating festivals.

◆ ◆ ◆

## शिक्षक दिन : प्रेरणेचा रंगमंच

**रक्षा देशपांडे**
संचालिका, स्वरनाद, पुणे

मागच्या दोन अंकांमध्ये लेख लिहिता आला नाही. सातत्य राखता आले नाही म्हणून अर्थातच खूप मनाला लागले. जुलै व ऑगस्ट महिना खूपच धावपळीत गेला. स्वरनादमध्ये जुलै, ऑगस्ट सणांचे दिवस तसेच ॲडमिशन व पाहुण्यांच्या भेटीचे दिवस असतात. स्थिरस्थावर होईपर्यंत सप्टेंबर उजाडतो. सप्टेंबर म्हटले की शिक्षक दिनाचे वारे वाहू लागतात. दरवर्षी शिक्षकदिनाच्या निमित्ताने लहानांनी वर्गात शिकवणे, पुनर्वसन केंद्र सगळ्या छोटुल्यांनी चालवणे हा दरवर्षीचा उपक्रम असतोच. तसाच यावर्षीही तो पार पडला. छोट्या बालकांनी त्याचा खूप आनंद लुटला. ४ सप्टेंबरला हा कार्यक्रम झाल्यावर ५ सप्टेंबरला फक्त शिक्षकांसाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचा स्वरनादचा प्रघात आहे. दरवर्षी शिक्षकांना आवडेल, सहभागी होता येईल तसेच नवीन काहीतरी अनुभव घेता येईल असे करण्याचा प्रयत्न असतो. माझ्यासाठी सुद्धा शिक्षक दिनाच्या निमित्ताने माझ्या मनातील भावना सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याची एक संधी असते. शिक्षकांसोबत संवाद साधण्याची पर्वणी असते. त्यामुळे नवनवीन क्लृप्त्या वापरत असतो. मगच्या वर्षी गप्पांगणची सहल. त्याआधीच्या वर्षी झपूर्झाची ओळख झाली होती. यावर्षी थोडे वैचारिक काहीतरी देऊया असा मानस होता.

डॉ. हेमा होनवाड हे नाव समोर आले. हेमा मॅडम बरोबर ४ ते ५ वर्षांपूर्वीची ओळख आमच्या सुहृद सौ. दाते मॅडम मुळेच खरंतर झालेली. त्यांच्या माध्यमातून संस्थेला आर्थिक मदतही झालेली होती. परंतू काही दिवसांपूर्वीच पालकत्व, शिक्षक यासंबंधीत पॉडकास्ट मी फेसबूकवर बघितला होता, तो बघितल्यावर वाटले, ह्यातील हेमा मॅडमचे विचार आपल्या शिक्षकांपर्यंत पोहोचावे. स्वरनादची मुले कर्णबधिर असल्यामुळे त्यासाठी अजून नवीन दृष्टिकोन त्यांच्या बोलण्यातून मिळू शकतो. खरंतर हेमा मॅडम ५ सप्टेंबरला पुण्याबाहेर जाणार होत्या. परंतू काही कारणाने ते रहित झाले व त्यांचा निरोप आला मी येते. खूप आनंद झाला. एक उत्तम शिक्षक, शिक्षक दिनानिमित्त लाभणार होता.

मुलांना कसे हाताळावे, बालकांची मानसिकता, आपण जेव्हा विद्यार्थ्यांना काही सांगतो तेव्हा आपण स्वतः कसे वागावे, प्रसंगातून मुलांना कसे शिकवावे त्यांची मानसिकता कशी ओळखावी. आपणही चुका करत असतो. त्या सुधारुन त्या अमलात कशा आणाव्यात. छोट्या छोट्या प्रसंगातून मुलांना कसे शिकवावे. आपल्याकडून चूक झाल्यास ती मुलांसमोर मान्य करुन पुढे कसे जावे. इ.अनेक उदाहरणे देऊन त्यांनी खूप छान पद्धतीने समजावून सांगितले. आपण मुलांना मोबाईल वापरायचा नाही म्हणतो, तेव्हा नाही हा नकारात्मक शब्द न वापरता सकारात्मकतेने कसे बोलावे, जेणे करुन मूल त्यातून शिकेल.

खरंच यावर्षीचा शिक्षक दिन हा वेगळ्या अर्थाने समृद्ध करणारा ठरला. शिक्षकांना नवीन उर्जा, नवा उत्साह देऊन गेला.

◆◆◆

## माझ्या विशेषत्वाने घडवलेली माझी ओळख – विशेष शिक्षिका

**सोनाली करमरकर**
ॲक्टिव्हिटी थेरपीस्ट, कोथरूड केंद्र

कॉलेजमध्ये असतानाच मी घरी शिकवण्या घेत असल्यामुळे शिकवण्याची कला मला अवगत झाली. त्याशिवाय माहेर आणि सासर अशा दोन्ही घरात शिक्षकी पेशातील अनेक माणसं असल्याने त्यांचा प्रभाव माझ्यावर पडत गेला, पण खरी शिक्षक म्हणून घडणं मात्र स्वरनाद संस्थेत आल्यावरच झालं.

माझा कायम विश्वास आहे की –

चांगला शिक्षक हा स्वतःला कधीच पूर्ण मानत नाही, तो आयुष्यभर शिकत राहतो, कारण शिकणे हीच त्याची खरी ताकद असते.

शिक्षक फक्त ज्ञान देत नाही, तर मुलांच्या मनात शिकण्याची आवड, कुतूहल आणि आत्मविश्वास निर्माण करतो. माझ्यासाठी स्पेशल टीचर होणं ही केवळ नोकरी नाही, तर ती जबाबदारी, सेवा आणि आयुष्याला अर्थ देणारी साधना आहे. विशेषतः कर्णबधिर मुलांबरोबर काम करताना दररोज नवनवीन आव्हाने समोर येतात. ही मुले साध्या गोष्टी शिकण्यासाठी जी मेहनत घेतात, त्यातूनच खरं शिक्षण काय असते याचा अनुभव येतो. त्यांच्या छोट्याशा प्रगतीच्या टप्प्यातही – मग तो पहिल्यांदा बोललेला अर्थपूर्ण शब्द असो, ऐकलेला आवाज असो किंवा स्वतःहून काही करून दाखवणं असो आम्हाला प्रचंड समाधान मिळतं.

स्वरनादमध्ये रुजू झाल्यावर माझ्याकडे इंग्रजी माध्यमाचे वर्गाची जबाबदारी आली. त्यावेळी Flag Hoisting हा शब्द मुलांना कसा समजवायचा, हा मोठा प्रश्न होता. तेव्हा आमच्या मुख्याध्यापिका अभिलाषा अग्निहोत्री मॅडम यांनी दिलेलं मार्गदर्शन आजही माझ्यासाठी मोलाचं आहे. प्रत्येक सहशिक्षकांकडून शिकत राहणं, हा माझ्या शिक्षकपणाचा अविभाज्य भाग बनला.

माझ्या OT ॲक्टिव्हिटीच्या वर्गात तर अजून वेगळीच शिकवण मिळाली. OT च्या थेरपीस्ट, पल्लवी देशपांडे मॅडमनी त्यांच्या संयमी, प्रेमळ स्वभावातून मुलांकडून क्रिया कशा करून घ्याच्या, याचं अप्रतिम कौशल्य मला दिलं.

या संपूर्ण प्रवासात मला एक गोष्ट सतत जाणवते ही मुले आपल्याला संयम, समजूतदारपणा आणि निस्वार्थ प्रेम शिकवतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यातली चमक आणि पालकांच्या कृतज्ञतेने भरलेल्या नजरा, हीच खरी शाबासकी आहे.

आज मला अभिमान आहे की मी या मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे भाग्य लाभले आहे. पालक जेव्हा अश्रूंनी डोळे भरून म्हणतात मॅडम,

आमच्या मुलाच्या आयुष्याला तुम्ही नवं वळण दिलंत तेव्हा जाणवतं की हाच आपल्या आयुष्याचा खरा सन्मान आहे.

अशी मी घडत असताना या सगळ्याच्या पाठी असलेला एक दुवा म्हणजे स्वरनादमधील माझ्या पहिल्या गुरु, स्वरनादच्या संचालिका रक्षा मॅडम, यांचे मी मनःपूर्वक आभार मानते. त्यांच्या विश्वासामुळेच मला या मुलांच्या जीवनात आनंद, आत्मविश्वास आणि बोलण्याची नवी दिशा देण्याची संधी मिळाली.

मी स्वतः कर्णबधिर आहे. कानांना श्रवणयंत्र आणि कॉक्लिअर इम्प्लांट मशीनच्या मदतीने मी आज ऐकू शकते. स्वरनादमध्ये प्रथम रुजू होताना रक्षा मॅडमनी मला सांगितले “आपल्या स्वरनादमधील ३ ते ६ वयोगटातील मुलांना आवाजाची ओळख नाही, त्यामुळे ते बोलू शकत नाहीत. पण जसं तू मशीनच्या मदतीने ऐकतेस आणि छान बोलतेस, तसंच तू या मुलांनाही शिकव.”

हा त्यांचा मोलाचा सल्ला मी मनात कोरून ठेवला आहे. हाच माझ्या कामाचा पाया आणि निःस्वार्थ कामाची प्रेरणा आहे.

आज स्वरनादमध्ये मुलांना शिकवताना मला वाटतं स्वरनादमध्ये मला फक्त शिक्षिका होण्याची संधी मिळाली नाही तर माझ्या अस्तित्वाला खरी ओळख दिली. हीच माझी खरी ताकद आणि हाच माझा अभिमान.

◆◆◆

## घडामोडी

२९ सप्टेंबर रोजी उरवडे येथील पुसाळकर स्वरनाद पुनर्वसन केंद्रात दसरा उत्सव आणि पाटी पूजन साजरे झाले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मेजर मैत्रेयी दांडेकर यांना आमंत्रित केले होते. त्यांनी पालकांसोबत मेजर म्हणून त्यांच्या प्रवासाबद्दल, पोषण आणि पॅरालिम्पिकबद्दल एक सत्र आयोजित केले. शीर्षक होते – आदिशक्ती – तुमच्या मर्यादा ओलांडा. सत्र अतिशय प्रेरणादायक होते. केंद्रातील सर्व महिला पालक सत्रामध्ये आवर्जून उपस्थित होत्या.

**– भाग्यश्री संवत्थरकर**

प्रशासकीय अधिकारी, पुसाळकर स्वरनाद, उरवडे, पुणे

## देवालयांच्या अंगणात घुमला कर्णबधिरतेविषयी जनजागृतीचा संदेश ।

– तृप्ती कोहिनकर
सामाजिक कार्यकर्ती, स्वरनाद, कोथरूड

कर्णबधिर मुलांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या स्वरनाद पुनर्वसन केंद्र, कोथरुड तर्फे यंदा जागतिक कर्णबधिर दिन (World Deaf Day) विशेष पद्धतीने साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे फेरी न काढता, यंदा नवरात्रोत्सवाचा उत्साह आणि देवी भक्तांची उपस्थिती लक्षात घेऊन, थेट जनतेपर्यंत पोहोचण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या वेळेत पुण्यातील सात प्रमुख देवी मंदिरांमध्ये जनजागृती मोहिम राबविण्यात आली.

जनजागृती उपक्रम – दिनानुसार वेळापत्रक

| दिनांक | मंदिर / परिसर |
|---|---|
| २३–२४ सप्टेंबर | श्री चतुःश्रृंगी देवी मंदिर, गोखलेनगर |
| २३–२४ सप्टेंबर | जयभवानी माता मंदिर, कोथरुड (पौड रोड) |
| २३–२४ सप्टेंबर | वनदेवी मंदिर, कर्वेनगर |
| २४–२५ सप्टेंबर | तांबडी जोगेश्वरी मंदिर, बुधवार पेठ |
| २५–२६ सप्टेंबर | भवानीमाता मंदिर, भवानीपेठ |
| २६ सप्टेंबर | जगदंबामाता मंदिर, सिंहगडरोड (धायरीफाटा) |
| २७ सप्टेंबर | श्री महालक्ष्मीमंदिर, कर्वेनगर (कॅनॉल रोड) |

उपक्रमात ३५ ते ४० पालकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.

काही पालकांनी सलग तीन ते चार दिवस उपस्थित राहून आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली. माहितीपत्रके, पोस्टर्स आणि प्रत्यक्ष संवाद यांद्वारे नागरिकांपर्यंत खालील महत्त्वाची माहिती पोहचविण्यात आली :

* लहान मुलांमधील कर्णबधिरता लवकर ओळखणे का महत्त्वाचे आहे ?
* ० ते ६ वर्षांच्या मुलांमध्ये लवकर हस्तक्षेप (Early Intervention) केल्यास होणारे फायदे.
* स्वरनादमधील तपासणी, श्रवणयंत्र, वाचाभाषा विकास व इतर सुविधा.

या उपक्रमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील विश्वस्त व कार्यकर्त्यांनी केलेले मनःपूर्वक सहकार्य. प्रत्येक ठिकाणी त्यांनी परवानगी देत जागा उपलब्ध करून दिली आणि मदतही केली. या सहकार्याशिवाय हा उपक्रम शक्यच झाला नसता.

त्या सेबतच स्वरनादच्या शिक्षिका आणि कार्यालयीन कर्मचारी वर्गाचा सक्रिय सहभाग तसेच वरिष्ठांचे मार्गदर्शन यामुळे मोहिम अधिक प्रभावी ठरली.

एकूणच, या उपक्रमातून आपण सगळे मिळून सुमारे ८००० ते १०००० नागरिकांपर्यंत कर्णबधिरते विषयी जागृती पोहोचवू शकलो. अनेक भक्तांनी स्वतःहून आमच्या ओळखीत एका मुलाला त्रास आहे, आम्ही तपासणीसाठी घेऊन येतो... अशी प्रतिक्रिया दिली.

हा उपक्रम केवळ माहितीपर नव्हता तर अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरला.

आपण सर्व मिळूनच समाजात खरा बदल घडवू शकतो हा विश्वास या निमित्ताने अधिक दृढ झाला.

◆◆◆

## घडामोडी

जागतिक कर्णबधिर दिनानिमित्त मी शीतल जोगावडे आणि एक पालक व त्यांची मुलगी आशा वर्करच्या मिटींगला दौंड मधील आरोग्यसेवा केंद्रामध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी जवळजवळ ४३ आशावर्कर महिलांपर्यंत आपल्या संस्थेची माहिती पेहोचली. पॅम्प्लेट दिले, तेथील डॉक्टरांची भेट घेतली, सुपरवायझर भेटले. अशा वर्कर महिलांनी माहिती ऐकल्यावर त्यांच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनी काही प्रश्न विचाले. सर्व आशा वर्करची नावे, फोन नंबर मिळतील असे सांगितले. एका मॅडमने त्वरीत ४ वर्षाच्या कर्णबधिर बालकाची माहिती दिली. आम्ही तुम्हाला नक्कीच सहकार्य करू असे आश्वासन दिले. मिटींगचे परिपूर्ण समाधान मिळाले.

**– शितल जोगावडे**

विशेष शिक्षिका, स्वरनाद, दौंड केंद्र

## जागतिक कर्णबधिर दिवसाचा जनजागृती जागर

– कादंबरी जोशी
सहाय्यक विशेष शिक्षिका, स्वरनाद, चिंचवड

मोरया सेंटर चिंचवड – दिनांक २८ सप्टेंबर २०२५ जागतिक कर्णबधिर दिनानिमित्त आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी म्हणजेच हॉस्पिटल, प्री प्रायमरी स्कूल, क्लिनिक, जिजामाता हॉस्पिटल पिंपरी, वेगवेगळ्या ठिकाणी भेट दिली. थेरगाव हॉस्पिटल पिंपरी–चिंचवड महानगरपालिका हॉस्पिटल येथे विजिटला गेलो त्या ठिकाणी लसीकरण विभागांमध्ये माहितीपत्रक वाटले त्या ठिकाणी आम्हाला डॉक्टर तन्वीर शेख भेटले. त्यांना आम्ही आपल्या संस्थेची माहिती सांगितली आणि आपण कर्णबधिर मुलांसाठी कसे काम करतो ते सांगितले. त्यांना खूप छान वाटले. त्यांनी आपल्या संस्थेचे आभार मानले.

त्याचप्रमाणे तालेरा हॉस्पिटलमध्ये जाऊनदेखील आपले माहितीपत्रक वाटले. तिथे आम्हाला आशा वर्कर्स भेटल्या त्यांनादेखील आम्ही कार्णबधिर मुलांसाठी कसे काम करतो याची पूर्ण माहिती सांगितली व त्यांना तुम्ही सर्वे करत असताना जर असे काही मूल आढळून आले किंवा बाळ एक वर्षाचे झाले तरी देखील बोलत नाही असे आढळले तर अशा पालकांना आमच्या संस्थेबद्दल सांगावे. काही अडचण आली तर माहितीपत्रकावरील कोणत्याही शाखेत जाऊन भेटावे, आम्ही नक्की त्यांना सहकार्य करू असे सांगितले. दोन्ही हॉस्पिटलमध्ये लसीकरण विभाग असल्यामुळे खूप छोट्या मुलांच्या पालकांना भेटता आले व थोडी जागरूकता करण्यात आली.

त्याचप्रमाणे स्टारबक्स स्कूल, मिरॅकल स्कूल, लिटिल स्टार स्कूल, मोहन नगर चिंचवड या प्री–पायमरी स्कूलला व्हिजीट करून आलो. तेथे शिक्षकांनी आम्हाला छान प्रतिसाद दिला. खूप छान सहकार्य केले आणि डॉक्टर गुंजाळ क्लिनिक, मोशी येथे पण व्हिजिट केली डॉक्टरांना माहिती सांगितली. त्यांनी पण छान प्रतिसाद दिला नक्कीच असे कोणी मूल आढळून आले तर आम्ही तुम्हाला कॉन्टॅक्ट करू असे सांगितले.

◆◆◆

# कर्णबधिर म्हणजे काय?

**गोकुळ निवांगुणे**
विशेष शिक्षिक, स्वरनाद, गोवा

**सप्टेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा जागतिक कर्णबधिर सप्ताह म्हणून जगभरात साजरा केला जातो. जेव्हा एखाद्या मुलाला आवाज ऐकू न आल्यामुळे ते बोलू शकत नाही त्याला आपण कर्णबधिर म्हणून संबोधतो.**

**कर्णबधिर मुले बोलू शकतात का?**
**हो, कर्णबधिर मुले आवाज ऐकायला लागली आणि जर स्पीच थेरपी घेतली तर सामान्य मुलांप्रमाणे बोलू शकतात.**

कर्णबधिर मुलांना योग्य वयात श्रवणयंत्र लावून, cochlear implant करून कर्णबधिर मुलांना स्पीच थेरपी देणे हा एकच पर्याय आहे.

**उपाय :**

जेव्हा एक हजार मुलांचे जन्म होतात त्यातील चार मुले कर्णबधिर म्हणून जन्म घेतात. कर्णबधिर मुलांना आवाज ऐकू येत नाही म्हणून ती बोलू शकत नाहीत. त्यांची बुद्धिमत्ता चांगली असते अशा मुलांना आपण योग्य वयामध्ये योग्य निदान आणि योग्य उपचार केले असता त्यांचे आपण कायमचे अपंगत्व दूर करू शकतो. इतर अपंगापैकी कर्णबधिरत्व हे असे एकच अपंगत्व आहे की ते आपण पूर्णपणे बरे करू शकतो.

**शिक्षण :**

नॉर्मल मुलांसाठी खूप ठिकाणी पूर्व प्राथमिक शाळा आहेत परंतु कर्णबधिर मुलांसाठी गोव्यामध्ये कुठेही पूर्व प्राथमिक शाळा नाहीत. कर्णबधिर मुलांना ६ वर्षांच्या पुढे शाळा आहे. परंतु बोलण्याचा कालावधी ० ते ६ वर्षांपर्यंतच असतो. म्हणून मुलांना पूर्वप्राथमिक म्हणजे ६ वर्षांपर्यंतच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

कर्णबधिर मुलांना लवकरात लवकर निदान आणि उपचार करून त्यांना श्रवणयंत्र देऊन त्यांना यंत्राच्या साहाय्याने बोलण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. गोव्यामध्ये दरवर्षी वीस हजार बालके जन्म घेतात त्यापैकी ८० मुले कर्णबधिर असू शकतात, जर या मुलांना लवकरात लवकर वाचा प्रशिक्षण म्हणजे बोलण्याचे प्रशिक्षण दिले तर त्यांचे पुढील आयुष्य नॉर्मल होऊ शकते, नॉर्मल मुलांप्रमाणे ही मुले बोलू शकतात. एवढेच नाही तर नॉर्मल मुलांप्रमाणे नोकऱ्या करू शकतात. समाजामध्ये अशा मुलांना कोणतीही अडचण येणार नाही. कोणावरही अवलंबून राहता येणार नाही. स्वतःच्या पायावर ही मुले चांगले नाव निर्माण करू शकतात. म्हणून प्रत्येकाने अशा समाजउपयोगी कामाला हातभार लावावा जेणेकरून प्रत्येक कर्णबधिर मुल बोलू शकेल.

## आपण काय मदत करू शकता.. ?

आपल्या नातेवाईकांमध्ये, आपल्या आजूबाजूला कोणी मूल बोलत नसेल किंवा मोठ्या आवाजाला प्रतिसाद देत नसेल तर तात्काळ संपर्क साधावा. पर्वरी येथे अनघा वाचासुंदर प्रतिष्ठान – पुरस्कृत वाचा–भाषा प्रशिक्षण केंद्र चालवले जाते व फोंडा येथे शारदा प्रतिष्ठान फोंडा तर्फे वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र चालवले जाते. आतापर्यंत या दोन्ही केंद्रांमधून ४५ मुलांनी स्वरनाद शाळेतून बोलण्याची कला विकसित करून सामान्य शाळेत प्रवेश मिळवला आहे.

**गोकुळ निवांगुणे**
**विशेष शिक्षक, स्वरनाद, गोवा**
**संपर्क : ९६२३७०१०२०**

### जागतिक कर्णबधिर दिनाचे उद्दिष्ट

**समावेशक समाज : कर्णबधिर व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वामुळे समाजामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभावाचा समाना करावा लागू नये, यासाठी हा दिवस त्यांना पूर्णपणे समाविष्ट करून घेण्यासाठी प्रत्नशील असतो. थोडक्यात, हा दिवस केवळ एका समुदायाचा नसून, तो संपूर्ण समाजाला एकत्र आणतो आणि कर्णबधिर व्यक्तींच्या सन्मानासाठी आणि समान हक्कांसाठी काम करण्याची प्रेरणा देतो.**

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## जागतिक कर्णबधिर दिन - २८ सप्टेंबर २०२५

**शीतल जोगावडे**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, दौंड केंद्र

**'श्रवणयंत्र आमचे कान, ठेवा त्यांचा मान'**

दिनांक २५, २६, २७ सप्टेंबर हे तीनही दिवस जागतिक कर्णबधिर दिन म्हणून साजरे करण्यात आले. या तीन दिवसांत आपल्या सेंटरमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. दिनांक २५ सप्टेंबर २०२५ वार गुरुवार रोजी विद्यार्थ्यांच्या काही ॲक्टिव्हीटी, खेळ, मेमरी गेम घेण्यात आले. दिनांक २६ सप्टेंबर २०२५ वार शुक्रवार या दिवशी आरोग्य सेवा केंद्र दौंड मधील श्री सैय्यद सर यांनी आपल्याला आरोग्य सेवा केंद्र कुरकुम या ठिकाणी विशेष करुन महिलांसाठी खूप मोठ्या आणि महत्त्वाच्या अशा समस्यांवरचे असे ते शिबीर आयोजित केले होते, तेथे आमंत्रित केले होते. त्या ठिकाणी आपल्या सेंटरमधील तीन विद्यार्थी ओम शिंदे, साक्षी शिंदे, आरोही कापसे आणि त्यांच्या माता (आई) यांना घेवून आम्ही दोघी सकाळी ११ ते २.४५ या वेळेत गेलो होतो. या शिबिरात जवळजवळ ७०० ते ८०० लोक सहभागी होते. या दिवशी दौंडमध्ये शिबीर चालू असतानाच पाऊस सुरु झाला होता पण तरीसुद्धा त्याकडे सर्वांनीच दुर्लक्ष केले. वेगवेगळ्या क्षेत्रांमधील डॉक्टर्स, नर्सेस उपस्थित होते. या शिबीरामध्ये अतिशय महत्त्वाच्या अशा १२ लोकांपर्यंत आपण जाऊन आपल्या संस्थेच्या कार्याची माहिती पोहोचवली. राहूलदादा कुल, दौंड तालुका आमदार यांची भेट झाली.

केडगाव PHC आंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांनी आपली माहिती विचारली. त्यांना आपले कार्य खूपच आवडले. मुलांशी संवाद साधला, साथ देण्याचे आश्वास दिले, अर्ली डिटेक्शन वर कार्यरत असणाऱ्या श्री.जाधव A.D. , श्री.फिरंगामाईमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या प्राचार्या E.N.T. डॉक्टर गायकवाड यांनी मुलांशी संवाद साधला. क्लिनीक वेळ सकाळी १० ते २ आणि संध्याकाळी ७.०० ते ९.०० बारामती चौक. या दिवशी अतिशय समाधान पूर्वक असे कार्य झाले. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी दौंडमध्ये शाळेपासून रॅली काढण्यात आली. पाऊस असल्यामुळे पूर्णवेळ रॅली न नेता मुख्य चौकात थांबून बालक, पालक, आम्ही हातात स्लोगन घेऊन, बॅनर घेऊन घोषणा दिल्या. भाजीवाले, दुकानदार यांना कॉक्लिआ वार्ता आणि पॅम्प्लेट देऊन पूर्ण माहिती सांगितली. शालीमार चौक, हुतात्मा चौक, पोलिसचौकी मधील पोलीसांना भेटून शाळेची माहिती सांगितली. त्यांनी आपल्या मुलांबरोबर संवाद साधला. अशा प्रकारे पाऊस पडून सुद्धा देवीच्या आशीर्वादाने कर्णबधिर दिन साजरा झाला.

◆◆◆

## स्वरनादमधिल शिक्षिका

**मंगल बोंबले**
पालक, स्वरनाद, कोथरूड

**गुरु ब्रह्मा गुरु विष्णु**
**गुरु देवो महेश्वरा,**
**गुरु साक्षात परब्रह्म**
**तस्मै श्री गुरवे नमः**

गुरु या शब्दाचा अर्थ खूप व्यापक आहे. गुरु म्हणजे कोण जो आपल्याला योग्य मार्ग दाखवितो. आपल्याला यशाची प्राप्ती करुन देण्यासाठी ज्याचे मोत्याचे योगदान लाभते तो म्हणजे गुरु. गुरु या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे मग त्यात आपली आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र, मैत्रिणी, नातेवाईक, शिक्षक हे सगळे आपले गुरुच असतात.

आई आणि वडील हे सगळ्यांचेच सर्वात पहिले गुरु असतात आणि दुसरे गुरु म्हणजे शिक्षक. आई–वडील मुलांना चांगले संस्कार देतात तर शिक्षक मुलांना त्यांच्या ध्येयापर्यंत पाहेचण्यासाठी योग्य मार्गदर्शन करतात. त्यांना समाजात निर्भिडपणे वावरण्याची तयारी शिक्षक शाळेतच करुन घेतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात या शिक्षकांचे महत्त्व काही वेगळेच असते.

सर्वसामान्य मुलांच्या जीवनात त्यांच्या शिक्षकांचे महत्त्व हे फक्त त्यांना योग्य मार्गदर्शन करणे त्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहचविण्याचेच असते. परंतु स्वरनादमधील शिक्षिका यांचे एका कर्णबधिर मुलांच्या जीवनातील स्थान हे एका आईप्रमाणे आहे असं म्हणतात की, नॉर्मल मूल हे त्याच्या आईच्या पोटात असल्यापासून तिचा आवाज ऐकते व गर्भातच शिकत असते परंतु एक कर्णबधिर मूल हे सर्वात आधी त्याच्या ताई चा म्हणजे (शिक्षिकेचा) आवाज ऐकते आणि ताईच त्याची पहिली आई होते.

श्रीकृष्णाला जन्म दिला देवकीने आणि पालन केले यशोदामाईने त्याप्रमाणेच कर्णबधिर मुलांना जन्म जरी आईने दिला असला तरी त्यांना घडविण्याचे काम मात्र या स्वरनादमधील शिक्षिकांनीच केलेले आहे.

नॉर्मल मूल जेव्हा शाळेत जाते तेव्हा त्याचे वय असते ५ ते ६ वर्ष तोपर्यंत त्याला चांगलीच समज आलेली असते ते एक–दोन दिवस रडते आणि शांत बसते व शिक्षकांनी सांगितलेले सर्व ग्रहण करत असते. परंतु एक कर्णबधिर मूल जेव्हा आवाज ऐकण्यासाठी ताईकडे मग ती शाळा असो किंवा सेंटर (स्वरनादचे) त्याचे वय असते ० ते ६ वर्ष या मुलांना ऐकू येत नसल्याने ते त्यांच्या भावना खुणांनी व्यक्त करत असतात. वय लहान असल्यामुळे रडणे ही त्यांची प्राथमिक क्रिया असते. जेव्हा हे मूल शाळेत येत आणि ताई त्याला शिकवण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते नुसतं रडतच असतं आणि

ताईकडे पाहण्यासही तयार नसते. मग त्या मुलाला आपल्या जवळ घेवून लाडीगोडी लावून शिकवणे, वेळप्रसंगी मुलांचा मार खाणे या सगळ्या गोष्टी या ताईंना सहन कराव्या लागतात. मुलांना शिकवण्यासाठी त्यांना आधी पूर्वतयारी करुन ठेवावी लागते मग त्यासाठी त्यांना मुलांना खेळण्यातून शिकवावे लागते. अ ते अः हे स्वर बोलून घ्यावे लागते हे स्वर शिकवताना मुलांनी आवाज ऐकला का? त्यांनी ते ऐकून मग बोलले का हे पण वारंवार तपासावे लागते. मुलांचे वय लहान असल्यामुळे त्यांना त्यांच्या कलेने शिकवावे लागते. प्रत्येक मुलाला वेगवेगळ्या पद्धतीने शिकवावे लागते. प्रत्येक मुलाला वैयक्तिकरित्या शिकवावे लागते. तसेच मुलांच्या मशीनवरही लक्ष ठेवावे लागते. कर्णबधिर मुलांना ऐकू येत नसल्यामुळे त्यांना सगळ्यांच गोष्टी चित्र स्वरुपात दाखवून मग त्याला शब्द द्यावा लागतो आणि हे सातत्याने केले तर त्या गोष्टीचे आकलन या मुलांना होते. त्यासाठी या ताईंना रोज नवनवीन गोष्टी मुलांना सांगण्यासाठी चार्ट बनवून मुलांना चित्र स्वरुपात प्रत्येक गोष्ट मांडावी लागते. प्रत्येक गोष्ट चित्र स्वरुपात मांडण्याबरोबरच आपले तोंड देखील सातत्याने चालू ठेवावे लागते. एकच गोष्ट या ताईंना मुलांना वारंवार सांगावी लागते ते पण एकाच मुलाला नव्हे तर इतर मुलांना सांगावी लागते.

मूल जेव्हा सर्वप्रथम त्यांच्या आई किंवा बाबाला आई-बाबा म्हणून हाक मारते तेव्हा तो आनंद त्याच्या आईवडिलांना होतो त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीचा आनंद एका कर्णबधिर मुलाने आई किंवा बाबा बोलल्याने त्याच्या आई-वडिलांना होतोच होतो पण या ताईंनादेखिल होतो व त्यांनी एवढे दिवस जे कष्ट घेतले त्याचे सार्थक झाल्यासारखे त्यांना वाटते. पण त्या एवढ्यावरच खूष होऊन थांबत नाहीत त्या नव्या जोमाने त्या मुलाला सर्वसामान्य मुलाप्रमाणे घडत नाही. (बोलत नाही) तोपर्यंत थांबत नाहीत.

स्वरनादमधील शिक्षिका ह्या केवळ मुलांच्याच शिक्षिका नसून त्या कर्णबधिर मुलांना शिकवण्याबरोबरच त्यांच्या आई-वडिलांना (पालकांना) शिकवत असतात. कर्णबधिर मूल माझ्याच पोटी का? देवाने मलाच का दिलं, मशिन लावून हे आवाज ऐकेल का... तो खरेच बोलेल का... असे अनेक प्रश्न या पालकांच्या मनात असतात. या प्रश्नांचे निराकरण करुन या पालकांना समजावण्याचे त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे काम या ताई करत असतात. या ताईंच्या मार्गदर्शनामुळे व आधारामुळेच अनेक पालक आपल्या मुलांना बोलते करुन सर्वसामान्य शाळेत प्रवेश घेवू शकले.

स्वरदानमधील शिक्षिकांकडून खूप काही गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. त्या प्रत्येक मुलाला आई होऊनच शिकवतात. त्यांच्यातील संयमीपणा हा वाखाणण्याजोगा असून त्यांच्या नियमीतपणाला माझा सलाम आहे.आपल्या मुलाला

घडविण्यासाठी व इतरही मुलांना घडविण्यासाठी किती व कसा त्याग करावा हे या शिक्षिकांकडून शिकावे. तसेच मुकबधिर मूल बोलते करण्याच्या त्यांच्या तळमळीची आणि धडपडीची तूलना कशा बरोबरच होऊ शकत नाही.

स्वरनादमधील शिक्षिका यांचे महत्त्व केवळ शिक्षका दिनानिमित्त मर्यादित नसून हे प्रत्येक कर्णबधिर मुलांच्या जीवनात अमर्याद असे आहे. मूकबधिर मुलाला बोलते करणारे खरे शिल्पकार हे शिक्षकच आहे. या मुलांना सर्वसामान्य मुलांसारखे जीवन जगण्याचा अधिकार व हक्क खऱ्या अर्थाने या शिक्षिकांनी प्राप्त करून दिलेला आहे. ५ सप्टेंबर हा एक शिक्षक दिन या शिक्षिकेसाठी मर्यादित नाही. अमर्याद असं कार्य या शिक्षिकांनी या मुलांसाठी केलेले असल्यामुळे संपूर्ण आयुष्य देखील त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी अपुरे आहे.

◆◆◆

## घडामोडी

दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ आणि दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ या दिवशी कॉक्लिआ पुणे हिअरिंग ॲण्ड स्पीच, स्वरनाद संस्थे तर्फे जागतिक कर्णबधिर दिनानिमित्त बालकांच्या पाठांतर स्पर्धा आणि पालकांच्या निबंध आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. आपला जागतिक कर्णबधिर दिन (International Deaf Day) साजरा करण्यामागील उद्देश अनेकविध आहेत. मुख्य उद्देश म्हणजे जागरूकता वाढवणे. कर्णबधिर व्यक्तींच्या गरजा, आव्हाने आणि क्षमतांबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, हक्क आणि समावेशासाठी आवाज उठवणे. कर्णबधिर व्यक्तींना शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि सामाजिक सहभाग यामध्ये समानसंधी मिळाव्यात यासाठी जनजागृती करणे असे आहेत. हा उद्देश स्वरनादमध्ये आणि स्वरनाद तर्फे बाकीच्या आपल्या सर्व केंद्रामध्ये अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करून जन जागृती केली जाते. आपल्या स्वरनाद केंद्रामध्ये झालेल्या पाठांतर स्पर्धेमध्ये ३० मुलांनी आणि निबंध स्पर्धेमध्ये ८ पालकांनी सहभाग घेतला होता. तसेच पोस्टर मेकिंगसाठी पालकांचे ६ ग्रूप केले होते. छोट्या बालकांनी आणि त्यांच्या पालकांनी उत्साहाने स्पर्धेमध्ये भाग घेतला. मुलांनी गाणी, गवळण, अंक, स्वर असे वेगळ्या वेगळ्या प्रकारचे पाठांतर सादर केले. त्यांचे परिक्षण करण्यासाठी आशा जोशी मॅडम ह्यांना आमंत्रित केले होते. मुलांनी सुंदर प्रकारे त्यांचे कौशल्य दाखवले. पालकांनी सुद्धा निबंध स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग मधून जागतिक कर्णबधिर दिनाचा जागरूकतेचा संदेश दिला.

**– नेहा नाटेकर**

समुपदेशक स्वरनाद, कोथरुड

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - SEPTEMBER 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 270 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 58 |
| 3. | Aided Audiogram Testing | 3 |
| 4. | No. of Speech Assessment | 2 |
| 5. | No. of Counseling Sessions | 12 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 65 |
| 7. | Group Occupational Therapy Sessions | 3 |
| 8. | Psychological Assessment | 3 |
| 9. | No. of Students getting Individual OT | 47 |
| 10. | No. of OT Screening | 27 |
| 11. | No. of Activity Therapy Session | — |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - SEPTEMBER 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 0 |
| 2. | Narayangoan | 32 |
| 3. | YCM Pimpari | 80 |
| 4. | Morya Chinchwad | 24 |
| 5. | Phonda | 18 |
| 6. | Porvorim | 40 |
| 7. | Manchar | 57 |
| 8. | Daund | 22 |
| 9. | Urawade (Residential) | 60 |
| 10. | Kudal | 29 |

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान–नाक–घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**

# जागतिक कर्णबधिर दिन



कोथरूड केंद्र


पुसाळकर केंद्र


पिंपरी केंद्र




मंचर केंद्र


पिंपरी केंद्र









दौंड केंद्र

RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th OCTOBER, 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.







## विजयादशमी








**Address :**
**To,**